महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत
ओम सुपर मार्केट जवळ, बहिरट पाटील चौक,
शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. :तंशिविकापु/विवि-५/ई-ऑफीस/२०२३/ 2405 दिनांक : 05 JUN 2023

**परिपत्रक**

प्राचार्य / संचालक,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय संस्था.
उपसचिव,
म. रा. तंत्रशिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, पुणे

**विषय :- उच्च व तंत्रशिक्षण विभाग व अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये एन. आय. सी.ई-ऑफिसची अंमलबजावणी करणेबाबत..**

**संदर्भ :-** १. शासन परिपत्रक क्र. बैठक -२०२२/प्र.क्र.१५६/आस्था-२, दि. १३.०३.२०२३.
२. संचालनालयाचे परिपत्रक क्र.०३/तंशिसं/आयटीसेल/EOffice/२०२३/१३, दि. १५.०३.२०२३.
३. संचालनालयाचे परिपत्रक क्र.४/आस्था/ई-ऑफिस/२०२३/३१४, दि. १९.०५.२०२३.

उपरोक्त संदर्भांकीत संदर्भ क्र. १ च्या परिपत्रकान्वये उच्च व तंत्रशिक्षण विभाग व अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये एन. आय. सी. ई-ऑफिसची अंमलबजावणी करण्यास्तव सूचना देण्यात आलेल्या आहेत. (सोबत शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडलेली आहे.) त्याअनुषंगाने शासनास सादर करावयाचे सर्व प्रस्ताव ई-ऑफिसमार्फत ई-फाईल स्वरुपात सादर करावयाचे आहेत.

सबब, या विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व संस्था प्रमुखांना/कार्यालय प्रमुख यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, ई-ऑफिस प्रणाली यशस्वीरित्या कार्यान्वित झाल्यानंतर आपल्या कार्यालयामार्फत विभागीय कार्यालयास सादर होणारे सर्व प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह स्कॅन करुन विभागीय कार्यालयास सादर करावेत. जेणेकरुन शासनास/संचालनालयास विहीत वेळेत ई-ऑफिसमार्फत ई-फाईल सादर करणे शक्य होईल. कागदपत्रे सादर करतांना ती योग्यप्रकारे स्कॅन करण्यात यावीत तसेच प्रस्तावात नमूद केलेले शासन निर्णय/परिपत्रक/नियम/पत्रव्यवहार यांच्या प्रती सुध्दा ई-ऑफिसमार्फतच सादर कराव्यात.

तसेच मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०२.०३.२०२३ रोजी झालेल्या बैठकीनुसार उच्च व तंत्रशिक्षण विभाग व अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये एन.आ.सी. ई-ऑफिस ची अंमलबजावणी करावयाच्या सूचना सोबत जोडल्या आहेत.

**(डॉ.द.व्यं.जाधव)**
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई (कार्यासन क्र.११) यांना माहितीस्तव सादर.
२. प्रोग्रामर तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शीत करणेकरीता.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७३/४०४/४२८,
ई-मेल-desk4@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : ४/आस्था/ई-ऑफिस/२०२३/३१४ दिनांक : 19 MAY 2023

परिपत्रक

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय : उच्च व तंत्रशिक्षण विभाग व अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये एन.आय.सी.ई-ऑफिसची अंमलबजावणी करणेबाबत...

संदर्भ : १) शासन परिपत्रक क्र. बैठक-२०२२/प्र.क्र. १५६/आस्था-२, दि. १३.०३.२०२३.
२) संचालनालयाचे परिपत्रक क्र. ०३/तंशिसं/आयटीसेल/EOffice/२०२३/१३, दि. १५.०३.२०२३.

महोदय,

उपरोक्त संदर्भ क्र. १ च्या परिपत्रकान्वये उच्च व तंत्रशिक्षण विभाग व अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये एन.आय.सी.ई-ऑफिसची अंमलबजावणी करण्यास्तव सूचना देण्यात आलेल्या आहेत (सोबत शासन परिपत्रकाची प्रत जोडली आहे). त्याअनुषंगाने शासनास सादर करावयाचे सर्व प्रस्ताव ई-ऑफिसमार्फत ई-फाईल स्वरुपात सादर करावयाचे आहेत.

त्यास अनसरुन आपणास कळविण्यांत येते की, आपल्या कार्यालयामार्फत संचालनालयास सादर होणारे सर्व प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह स्कॅन करुन संचालनालयास सादर करावेत. जेणेकरुन शासनास विहित वेळेत ई-ऑफिसमार्फत ई-फाईल सादर करणे शक्य होईल. कागदपत्रे सादर करतांना ती योग्यप्रकारे स्कॅन करण्यात यावीत तसेच प्रस्तावात नमूद केलेले शासन निर्णय/परिपत्रक/नियम यांच्या प्रती सुध्दा ई-ऑफिसमार्फतच सादर कराव्यात.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
30 MAY 2023
आवक क्र.......

आपला,

(महेंद्र के दवणे)
उपसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग ,मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक४ १८,

चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

Email ID:do.asthahte-mh@mah.gov.in

परिपत्रक क्रमांक: बैठक-२०२२/प्र.क्र.१५६/आस्था-२ दि. १३ मार्च, २०२३.

विषय: उच्च व तंत्र शिक्षण विभाग व अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये
**एन.आय.सी. ई-ऑफिस ची अंमलबजावणी करणेबाबत**

परिपत्रक

प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०२.०३.२०२३ रोजी झालेल्या बैठकीनुसार उच्च व तंत्र शिक्षण विभाग व अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये एन.आय.सी. ई-ऑफिस ची अंमलबजावणी करण्यास्तव सर्व अधिकारी/ कर्मचारी यांना पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:

१ उच्च व तंत्र शिक्षण विभाग व अधिपत्याखालील कार्यालयात तयार होणा-या सर्व नवीन नस्ती दि. १५/०३/२०२३ पासून ई-ऑफिस मार्फत e-file स्वरूपातच सादर करण्यात याव्यात.

२. उच्च व तंत्र शिक्षण विभागातून इतर मंत्रालयीन विभागात तसेच अधिनस्त कार्यालयांशी होणा-या सर्व पत्रव्यवहारासाठी डिजिटल स्वाक्षरीचाच वापर करण्यात यावा.

३. टायपिंग साठी फक्त DVOT-SurekhMR या फॉन्टचाच वापर करावा.

४. सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी डिजिटल स्वाक्षरी साठी आवश्यक DSC (Digital Signature Certificate) संचालक माहिती तंत्रज्ञान यांच्याकडून प्राप्त करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

५. प्रधान सचिव यांचे कार्यालय /संचालक, उच्च/तंत्र/ग्रंथालय/कला यांचे कार्यालयातील नोंदणी शाखेने आलेल्या सर्व टपालाच्या वर्गीकरणासाठी आवश्यक अशी प्रमाण पद्धत विकसित करावी.

६. विभागातील व विभागाच्या अधिपत्याखालील ज्या अधिकारी/कर्मचारी यांचे एन.आय.सी. ई-मेल नाहीत अशा संबंधितांनी एन.आय.सी. ई-मेल उघडण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी .

७.दि. १५/०३/२०२३ पासून नोंदणी शाखेत प्राप्त सर्व टपाल/ पत्र स्कॅन करून e-office मध्ये नोंद घ्यावी.

(मो. गं. आरसेवाड)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई ३२
२. संचालक, उच्च/तंत्र/ग्रंथालय/कला महाराष्ट्र राज्य, पुणे, मुंबई.
३. सर्व सह सचिव/ उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी, राज्य संपर्क अधिकारी (राष्ट्रीय सेवा योजना), उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई ३२

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी क्र.022-68597423/67, ई-मेल-desk3@dtemaharashtra.gov.in,

वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

जा. क्र. 03/तंशिसं/आयटीसेल/EOffice/2023/13 दिनांक: - 15/03/2023

परिपत्रक

विषय:- ई-ऑफिसच्या अंमलबजावणी बाबत ..

संदर्भ :- शासन परिपत्रक क्रमांक : बैठक-2022/प्र. क्र. 156/ आस्था-2 दि. 13 मार्च 2023

उपरोक्त संदर्भीय शासन परीपत्रक नुसार मा. प्रधान सचिव यांनी उच्च व तंत्र शिक्षण विभाग व आधिपत्याखालील कार्यालयांमध्ये ई- ऑफिस ची अंमलबजावणी करणे बाबत खालील सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय व सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, म. रा. मुंबई यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावी व तसेच आपापल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय संस्थाना याबाबत अवगत करावे. सदर कार्यवाहीचा अहवाल त्वरित संचालनालयास पाठवावा.

१. विभागीय कार्यालयांत तयार होणाऱ्या सर्व नवीन नस्ती दि. 15/03/2023 पासून ई-ऑफिस मार्फत e-file स्वरूपातच सादर करण्यात याव्यात.
२. संचालनालय व अधिनस्त कार्यालयांशी होणारा सर्व पत्र व्यवहारासाठी digital signature चा वापर करण्यात यावा.
३. टायपिंग साठी फक्त DVOT-SurekhMR या font चा वापर करावा.
४. विभागीय कार्यालये व अधिनस्त कार्यालयातील अधिकारी यांचे करिता Digital signature Certificate आपल्या स्तरावर खरेदी करून घेण्यात यावे.
५. विभागीय कार्यालये यांनी आपल्या कार्यालयातील व अधिनस्त कार्यालयांच्या नोंदणी शाखेत आलेल्या सर्व टपालाच्या वर्गीकरणासाठी आवश्यक SOP विकसित करावी.
६. विभागीय कार्यालयातील व त्यांच्या अधिपत्याखालील शासकीय संस्था मधील ज्या अधिकारी / कर्मचारी यांचे ई-मेल आयडी तयार करण्या बाबत कार्यवाही झालेली नाही अशा संबंधितांची ई -मेल तयार करण्याबाबत कार्यवाही पूर्ण करावी.
७. दि. 15/03/2023 पासून नोंदणी शाखेत प्राप्त सर्व टपाल /पत्र स्कॅन करून ई-ऑफिस मध्ये नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद म. मोहितकर )
प्र.संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :-
1) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहिती करिता सादर.
2) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, म. रा. मुंबई यांना वरील प्रमाणे E-Office च्या अंमलबजावणी करिता.
3) सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय अंतर्गत सर्व विभागीय कार्यालये, वरील प्रमाणे E-Office च्या अंमलबजावणी करिता.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र.022-68597423/67, ई-मेल-desk3@dtemaharashtra.gov.in,
वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

दिनांक: - 15/03/2023

जा. क्र. 03/तंशिसं/आयटीसेल/EOffice/2023/13

परिपत्रक

**विषय:-** ई-ऑफिसच्या अंमलबजावणी बाबत ..
**संदर्भ :-** शासन परिपत्रक क्रमांक : बैठक-2022/प्र. क्र. 156/ आस्था-2 दि. 13 मार्च 2023

उपरोक्त संदर्भीय शासन परीपत्रक नुसार मा. प्रधान सचिव यांनी उच्च व तंत्र शिक्षण विभाग व आधिपत्याखालील कार्यालयांमध्ये ई- ऑफिस ची अंमलबजावणी करणे बाबत खालील सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय व सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, म. रा. मुंबई यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावी व तसेच आपापल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय संस्थाना याबाबत अवगत करावे. सदर कार्यवाहीचा अहवाल त्वरित संचालनालयास पाठवावा.

१. विभागीय कार्यालयांत तयार होणाऱ्या सर्व नवीन नस्ती दि. 15/03/2023 पासून ई-ऑफिस मार्फत e-file स्वरूपातच सादर करण्यात याव्यात.
२. संचालनालय व अधिनस्त कार्यालयांशी होणारा सर्व पत्र व्यवहारासाठी digital signature चा वापर करण्यात यावा.
३. टायपिंग साठी फक्त DVOT-SurekhMR या font चा वापर करावा.
४. विभागीय कार्यालये व अधिनस्त कार्यालयातील अधिकारी यांचे करिता Digital signature Certificate आपल्या स्तरावर खरेदी करून घेण्यात यावे.
५. विभागीय कार्यालये यांनी आपल्या कार्यालयातील व अधिनस्त कार्यालयांच्या नोंदणी शाखेत आलेल्या सर्व टपालाच्या वर्गीकरणासाठी आवश्यक SOP विकसित करावी.
६. विभागीय कार्यालयातील व त्यांच्या अधिपत्याखालील शासकीय संस्था मधील ज्या अधिकारी / कर्मचारी यांचे ई-मेल आयडी तयार करण्या बाबत कार्यवाही झालेली नाही अशा संबंधितांची ई -मेल तयार करण्याबाबत कार्यवाही पूर्ण करावी.
७. दि. 15/03/2023 पासून नोंदणी शाखेत प्राप्त सर्व टपाल /पत्र स्कॅन करून ई-ऑफिस मध्ये नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद म. मोहितकर )
प्र.संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :-
1) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहिती करिता सादर.
2) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, म. रा. मुंबई यांना वरील प्रमाणे E-Office च्या अंमलबजावणी करिता.
3) सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय अंतर्गत सर्व विभागीय कार्यालये वरील प्रमाणे E-Office च्या अंमलबजावणी करिता.

पुणे.
29 MAR 2023
आवक क्र. 2023

RO, Pune.